## अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २५.०४.२०२५**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (१९.०४.२०२५ ते २५.०४.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२६.०४.२०२५ ते ३०.०४.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | दिनांक | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ५ | ७ | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ४१ | ३९ | ३८ | ३८ | ३९ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २५ | २४ | २३ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ३ | ४ | ३ | १ | १ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६९ | ६८ | ६८ | ६९ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४२ | ४३ | ४२ | ४२ | ४३ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ५ | ५ | ५ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प.वा. | प.वा. | प.वा. | प. | प.नै. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २६ ते २८ एप्रिल दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तसेच दिनांक २९ व ३० एप्रिल रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवस कमाल तापमान ३८.० ते ४१.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान २३.० ते २५.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६८ ते ६९% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ४२ ते ४३% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते ०८ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ३० एप्रिल ते ६ मे, २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी तर किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान ईशारा | | सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २५ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना विजांचा कडकडाट ताशी ३० ते ४० इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २६ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना विजांचा कडकडाट ताशी ३० ते ४० इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ जिल्ह्यामध्ये २५,२६ व २७ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकाची (सूर्यफूल, ज्वारी व कांदा) काढणी करावी व मळणी करून तयार झालेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>➢ दिनांक २५,२६ व २७ एप्रिल रोजी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बंधूंनी स्वत:ची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी<br>❖ **शेतकरी बांधवांनी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ मेघ गर्जना, विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/बांबू च्या सहय्याने आधार द्यावा.<br>➢ शेतामध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव, नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्यांना त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टिकच्या शीटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>➢ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये. |
| संदेश | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" तर विजांच्या अंदाजासाठी "दामिनी" हे अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करून वापरावे. |
| भुईमुग | वाढीची | ➢ भुईमुग पिकातील सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी ०.५% लोह व ०.२ % झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ५० व ७०दिवसांनी पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ सुरु ऊस लागवडीस मोठ्या बांधणीच्या वेळी रासायनिक खतांची मात्रा नत्र १०० किलो (युरिया २१७ किलो), स्फुरद ५५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट ३४४ किलो) व पालाश ५५ किलो(म्युरेट ऑफ पोटॅश ९२ किलो) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावी.<br>➢ पावसाची उघडीप पाहून २८ एप्रिल नंतर खतांचा हप्ता द्यावा. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| द्राक्ष | वाढीची | ➢ द्राक्ष फळबागेमध्ये एप्रिल/खरड छाटणी करून घ्यावी. द्राक्षवेलीच्या काडीवरील डोळयामध्ये सूक्ष्मघड निर्मिती होण्यासाठी एप्रिल किंवा खरड छाटणी महत्वाची असते.<br>➢ खरड छाटणी वेळेवर करून छाटलेल्या काड्या व पाने बांधावर न टाकता दूरवर जाळून नष्ट कराव्यात.<br>➢ खरड छाटणी नंतर फुटवे फुटण्याच्या अवस्थेत असताना द्राक्ष बागेस १२७५० ते १५३०० लिटर प्रती एकर इतके पाणी द्यावे. |
| आंबा | फळ पक्वता | ➢ आंबा पिकामध्ये तयार झालेली फळे नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.<br>➢ उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी आणि फळांमध्ये साका तयार होण्याचे टाळण्यासाठी काढलेली फळे सावलीत ठेवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. |
| केळी | वाढीची | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या/ काढणीस आलेल्या घडांची काढणी करावी व काढणी केलेले घड सुरक्षित ठिकाणी ठेवावेत<br>➢ पाऊस व जोरदार वाऱ्याने केळी झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून फळझाडांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| टोमॅटो | वाढीची | ➢ दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी मेघर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो रोपांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| कांदा | पक्वता | ➢ पक्व झालेल्या कांदा पिकाची त्वरित काढणी करून घ्यावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकणी ठेवावा .<br>➢ कांदा पिकाची काढणी केली असल्यास व त्वरित सुरक्षित ठिकाणी नेणे शक्य नसल्यास शेतामध्ये गोळा केलेले कांदे पॉलीथिन शीटने झाकावेत. |
| पशुधन | वाढीची | ➢ ईशारा कालावधीदरम्यान जनावरे शक्यतो बाहेर चारावयास नेऊ नयेत.<br>➢ मेघगर्जना ,विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्रीमधील पक्षांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पोल्ट्रीच्या बाजूने बारदाणे लावावेत व त्यावर वारंवार पाणी शिंपडावे जेणेकरून आतील तापमान कमी राहण्यास मदत होईल.तसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी . |

मेघदूत अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे

दामिनी अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : २५.०४.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**